मंगळवार दि. २९ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २८ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

निर्विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## ‘राहुल गांधींचा फेक नॅरेटिव्ह निवडणूक आयुक्तांच्या पत्रकार परिषदेमुळे उध्वस्त’; रावसाहेब दानवेंचा हल्लाबोल

### ‘संविधान हातात घेऊन संवैधानिक संस्थांवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याची रणनीती’; ‘व्होटचोरी’चा आरोप करणाऱ्यांनी आत्मपरीक्षण करावे, दानवेंचा टोला

**जालना । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून निवडणूक प्रक्रिया, मतदार याद्या आणि विशेष गहन पुनरिक्षण अर्थात च्या मुद्द्यावरून देशातील राजकीय वातावरण तापले असताना माजी केंद्रीय राज्यमंत्री तथा भाजप नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि इंडिया आघाडीवर जोरदार टीका केली. निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून विरोधकांकडून करण्यात येणाऱ्या आरोपांवर भाष्य करताना, ‘‘तीनही निवडणूक आयुक्तांच्या पत्रकार परिषदेमुळे राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उभा केलेला फेक नॅरेटिव्ह पूर्णपणे उध्वस्त झाला आहे,’’ असा दावा दानवे यांनी केला.

या पत्रकार परिषदेला भास्कर दानवे, राजेश राऊत, रामेश्वर भांदरगे, अर्जुन गेही, बद्री पठाडे आणि सिद्धिविनायक मुळे यांची उपस्थिती होती.

दानवे म्हणाले की, गेल्या दोन-चार दिवसांपासून इंडिया आघाडीकडून निवडणूक प्रक्रिया आणि निवडणूक आयोगाबाबत विविध आरोप केले जात आहेत. निवडणुका पुन्हा घेण्यात याव्यात, निवडणूक आयुक्तांवर कारवाई करण्यात यावी, अशा मागण्या पुढे येत आहेत. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने घेतलेल्या पत्रकार परिषदेत सह विविध प्रक्रियांबाबत स्पष्टीकरण देण्यात आले असून, आयोगाच्या म्हणण्यानुसार निर्णय एकमताने घेण्यात आले आहेत. राहुल गांधी यांच्या राजकीय भूमिकेवर टीका




करताना दानवे म्हणाले, ‘‘राहुल गांधींचा डिझाईन वेगळा आहे. संविधानाचे पुस्तक हातात घेऊन संवैधानिक संस्थांवर रोज आरोप करायचे, या संस्थांबद्दल जनतेच्या मनात अविश्वास निर्माण करायचा, अशी त्यांची रणनीती आहे. संविधानाने निर्माण केलेल्या लोकशाही व्यवस्था आणि संवैधानिक संस्थांवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

राहुल गांधींची भूमिका संविधान आणि संवैधानिक संस्थांबाबत विरोधाभासी असल्याचे दानवे यांनी म्हटले. ‘‘भारतीय संविधान जरी ते दाखवत असले तरी या संविधानाने दिलेली लोकशाही व्यवस्था त्यांना मान्य आहे का? संविधानाने तयार केलेल्या संवैधानिक संस्था मान्य आहेत का? हा प्रश्न आहे,’’ असे दानवे म्हणाले.

राहुल गांधींच्या राजकीय भूमिकेवर टीका करताना दानवे यांनी त्यांच्यावर अतिडाव्या विचारसरणीकडे झुकल्याचा आरोप केला. मात्र हा त्यांचा राजकीय दावा असल्याचे स्पष्ट आहे. निवडणूक आयोगातील कथित मतभेदांच्या चर्चेवर भाष्य करताना दानवे म्हणाले की, कॅबिनेट सेक्रेटरींकडे पाठविण्यात आलेले पत्र कोणत्याही नीतिगत किंवा धोरणात्मक विषयाशी संबंधित नव्हते. ‘‘ते डेप्युटेशनवरील नियुक्तीशी संबंधित पत्र होते. मात्र त्या पत्राला वेगळे स्वरूप देऊन निवडणूक आयोगामध्ये मतभेद असल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न झाला,’’ असा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, या मुद्द्यावर माध्यमांमध्ये वेगवेगळे वृत्तप्रवाह समोर आले आहेत. काही वृत्तांत दोन निवडणूक आयुक्तांनी विविध निर्णयांवर औपचारिक आक्षेप नोंदवल्याचे म्हटले आहे, तर निवडणूक आयोगाने सह आयोगाचे अंतिम निर्णय एकमताने झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या वादात आयोगाची अधिकृत भूमिका आणि माध्यमांतील (पान २ वर)

## नागेश आडगावकरांच्या सुरेल सुरांनी माणिक मोती संगीत महोत्सवात रंगली भक्तिरसाची मैफल!

**जालना : प्रतिनिधी**

पद्मविभूषण उस्ताद राशीद खाँ साहेब यांचे पट्टशिष्य पं. नागेश आडगावकर यांच्या अप्रतिम व भावपूर्ण गायकीने ‘माणिक मोती’ संगीतोत्सवात सुरांची अविस्मरणीय मैफल रंगली. अभंगवाणी, नाट्यसंगीत आणि रागदारी संगीताच्या त्रिवेणी संगमाने जालनेकर रसिकश्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कै. माणिकराव शंकरराव अग्निहोत्री (सेवलीकर) यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी रविवारी सायंकाळी जेईएस महाविद्यालयाच्या चुन्नीलाल जी. गोयल सभागृहात या भव्य संगीतोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. विनायक सेवलीकर यांनी केली. कार्यक्रमाची सुरुवात पं. नागेश आडगावकर यांनी ‘राम कृष्ण हरी, जय जय राम कृष्ण हरी’ या नामघोषाने केली. त्यानंतर ‘सुंदर ते ध्यान उभे विटेवरी’, ‘समाधी साधन संजीवन नाम’, ‘पाहू द्या रे मज विठोबाचे मुख’ आणि ‘घेई घेई माझे वाचे गोड नाम विठोबाचे’ या अभंगांच्या भावपूर्ण सादरीकरणातून त्यांनी रसिकांना विठ्ठलभक्तीत तल्लीन केले. त्यांच्या प्रभावी स्वरविस्तार आणि हरकतींनी प्रत्येक रचनेला विशेष उंची प्राप्त करून दिली. अभंगवाणीनंतर त्यांनी ‘देवाघरचे ज्ञात कुणाला’ हे लोकप्रिय नाट्यगीत शास्त्रीय ढंगात सादर करून रसिकांची वाहवा मिळवली. तसेच ‘एकच रे मागणी तुझ्या पायी देवा’, ‘समयासी सादर व्हावे’, ‘धरुनीया पदराला ओढू नको रे नंदलाला’ आणि ‘बाळ सगुण गुणाचे तान्हे, बाळ दिसते गोजिरवाणे ग’ या विविध भावछटा उलगडणाऱ्या रचनांनी सभागृहात भावपूर्ण वातावरण निर्माण केले.

मैफिलीचा समारोप पं. आडगावकर यांनी ‘आज राधा ब्रिज को चली’ या भैरवीने केला. (पान २ वर)

## अपुऱ्या पावसामुळे सोमठाणा तलावातील मत्स्यउत्पादनात मोठी घट – मंत्री नितेश राणे

### जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे, आमदार नारायण कुचे यांची उपस्थिती

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील सोमठाणा तलावाची मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी तलाव परिसराची पाहणी करून मच्छीमार बांधवांशी संवाद साधत त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या. राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त मच्छीमारांच्या समस्या थेट जाणून घेण्यासाठी



मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या समवेत जालना जिल्ह्यातील बदनापुर तालुक्यातील राजेवाडी आणि सोमठाणा तलावांमधील पाणीसाठा, मत्स्यव्यवसायाची स्थिती आणि मच्छीमारांचे झालेले नुकसानाची प्रत्यक्ष पाहणी केली.

मत्स्यव्यवसायाला शेतीचा दर्जा देण्यात आल्याने दुष्काळाच्या संकटात मच्छिमारांपर्यंतही शासनाची मदत पोहोचविण्याची भूमिका असल्याचे सांगत श्री. राणे म्हणाले की, तसेच स्थानिक मच्छिमारांशी संवाद साधला. बदनापुर तालुक्यातील राजेवाडी आणि सोमठाणा तलावातील पाण्याची पातळी कमी झाल्याने मत्स्य उत्पादनावर परिणाम झाला आहे. पाणीसाठा आणि मत्स्यव्यवसाया वरील परिणामाचे मोजमाप करून पंचनामे करुन त्यानुसार नियमानुसार मदत देण्याची केली जाणार असल्याचे श्री. राणे यांनी यावेळी सांगितले. यावर्षी अपुऱ्या पावसामुळे सोमठाणा तलावातील पाण्याची पातळी मोठ्या प्रमाणात घटली आहे. परिणामी (पान २ वर)

## बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई – जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांविरुद्ध कठोर मोहीम राबविण्याचे आणि डेंग्यूच्या पार्श्वभूमीवर सर्व स्तरांवर समन्वयाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल (भा.प्र.से.) यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात आज त्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील डॉक्टर्सची बैठक झाली. जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी,



जिल्हा हिवताप अधिकारी, सर्व तालुका आरोग्य अधिकारी बैठकीस उपस्थित होते. जिल्ह्यात ६७१ खासगी वैद्यकीय व्यावसायिक असून त्यापैकी ३६ जण बोगस असल्याचे आढळले आहे. आतापर्यंत बोगस डॉक्टरांविरुद्ध ७ तक्रारी प्राप्त झाल्या असून सर्व ७ प्रकरणांत कारवाई झाली आहे. बदनापूर तालुक्यात बोगस डॉक्टरांची संख्या वाढल्याचे निदर्शनास आल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी दोषींवर तत्काळ गुन्हे (एफआयआर) दाखल करण्याचे निर्देश दिले. त्या म्हणाल्या की, बोगस डॉक्टरांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. जिल्ह्यात यावर्षी २८ सप्टेंबरपर्यंत डेंग्यूचे १७ रुग्ण आढळले असून, सध्या जिल्ह्यात डेंग्यूचा उद्रेक झालेला नाही. आतापर्यंत ८८१ रॅपिड डेंग्यू (पान २ वर)

### दलित-आदिवासींच्या हक्कांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत द्या; भूमिहीन कास्तकारांना सातबारा द्या – दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. मगरे

**जालना - प्रतिनिधी**

दलित, आदिवासी आणि वंचित समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना दलित आघाडीच्या

वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. दलित आघाडी जिल्हाप्रमुख तथा भुमिहिन कास्तकरांचे नेते ॲड. भास्कर मगरे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात सुमारे तीन ते साडेतीन हजार कास्तकर, भुमिहिन,



बेघर नागरिक सहभागी झाले होते. हातात मागण्यांचे फलक घेत आंदोलकांनी शासनाच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करीत जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. दरम्यान यावेळी शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर करुन सविस्तर चर्चा केली. दरम्यान रखरखत्या ऊन्हात रस्त्याच्या एका बाजुला अगदी शिस्तीत हा मोर्चा निघाला. दुष्काळामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली. तसेच अनेक वर्षांपासून जमिनीवर प्रत्यक्ष शेती करणाऱ्या भूमिहीन कास्तकारांच्या जमिनीच्या हक्काचा प्रश्न प्रलंबित आहे. या कास्तकारांना त्यांच्या जमिनीचे सातबारा (पान २ वर)

## धोकादायक आणि मोडकळीस आलेल्या इमारतींना वीजपुरवठा देण्यास उच्च न्यायालयाचा स्पष्ट नकार

**जालना - प्रतिनिधी**

असुरक्षित घोषित करण्यात आलेल्या आणि पाडण्याच्या अवस्थेत असलेल्या इमारतींमध्ये कोणत्याही परिस्थितीत वीजजोडणी देण्याचे सक्तीचे आदेश दिले जाऊ शकत नाहीत, असा महत्त्वपूर्ण निर्णय कलकत्ता उच्च न्यायालयाने दिला आहे. जिथे नागरिकांच्या जिवाला तसेच मालमत्तेला गंभीर स्वरूपाचा धोका निर्माण झालेला असतो, तिथे अशी मागणी मान्य करता येणार नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने सी.ई.एस.सी. या वीज वितरण कंपनीविरोधात दाखल केलेली याचिका फेटाळून लावली. न्यायमूर्ती ओम नारायण राय यांच्या एकलपीठासमोर ‘मेसर्स एस.ए. प्रिंटर्स’ यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांनी कोलकाता येथील माणिकतला मुख्य रस्त्यावरील एका जागेवर छापखान्यासाठी वीजजोडणी देण्याची मागणी केली होती. आपण या इमारतीत भाडेकरू असून महापालिकेकडून परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे, तसेच पोलिसांनीही (पान २ वर)

### SIR प्रक्रियेच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन

## ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जालन्यात काँग्रेसचा आक्रमक रास्ता रोको

### *खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हाध्यक्ष कल्याण दळे यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात*

**जालना । प्रतिनिधी**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीविरोधात तसेच विशेष सखोल पुनरिक्षण अर्थात प्रक्रियेच्या निषेधार्थ जालना जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने सोमवारी (दि. २८) जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आक्रमक आंदोलन करण्यात आले. दुपारी तीन वाजता सुरू झालेल्या या आंदोलनाला





कार्यकर्त्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्त्यावर ठिय्या देत रास्ता रोको केला. आंदोलनादरम्यान ज्ञानेश कुमार तसेच केंद्रातील मोदी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. खासदार डॉ. कल्याण काळे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष कल्याण दळे, डॉ. विशाल धानुरे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख, माजी आमदार राजेश राठोड, राजाभाऊ देशमुख, बदर चाऊस यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते या आंदोलनात सहभागी झाले होते. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण आणि मतदार याद्यांमध्ये कोणत्याही पात्र मतदाराचे नाव चुकीच्या (पान २ वर)

# संपादकीय...

## घोषणांचा पाऊस, मदतीची प्रतीक्षा; दुष्काळात बळीराजाच्या हाती काय?

परतूर तालुक्यातील वरफळच्या शेताच्या बांधावर उभे राहून आदित्य ठाकरे यांनी सरकारवर केलेले आरोप हे स्वाभाविकपणे राजकीय आहेत. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात आरोप-प्रत्यारोप होत राहणार. मात्र या राजकीय वादापलीकडे वरफळच्या बांधावरून एक अत्यंत मूलभूत प्रश्न समोर येतोदुष्काळ जाहीर झाला, पण संकटात सापडलेल्या शेतकऱ्याच्या हातात प्रत्यक्ष मदत कधी पोहोचणार? महाराष्ट्र सरकारने २६५ तालुक्यांत दुष्काळस्थिती जाहीर केली आहे. या निर्णयानंतर कर्ज पुनर्गठन, महसूल सवलती, कृषीपंपांच्या वीजबिलांबाबत सवलत आणि कर्जवसुली पुढे ढकलण्यासारख्या उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत. पीक नुकसानीची आर्थिक मदत निर्धारित प्रक्रियेनंतर जाहीर केली जाणार आहे. याचा अर्थ एक गोष्ट स्पष्ट आहेदुष्काळाची सरकारी मान्यता ही शेवटची पायरी नाही; ती प्रत्यक्ष मदत वितरणाची सुरुवात आहे. सरकारी आदेश, अधिसूचना आणि पॅकेज हे प्रशासनासाठी आवश्यक असतात; पण शेतकऱ्यासाठी त्याहून महत्त्वाचे असते ते त्याच्या खात्यात जमा होणारे अर्थसाहाय्य, पीकविम्याची रक्कम, कर्जवसुलीपासून मिळणारा दिलासा आणि पुढील हंगामासाठी उभे राहण्याची क्षमता. वरफळमध्ये नुकसानग्रस्त सोयाबीनच्या शेतात उभ्या असलेल्या शेतकऱ्याची अवस्था या वास्तवाची आठवण करून देते. पिकासाठी केलेला खर्च, पावसाचा प्रदीर्घ खंड, उत्पादनातील घट आणि त्याच वेळी कर्जाची परतफेडया सगळ्याचा मेळ शेतकरी कसा घालणार? दुष्काळाची व्याख्या प्रशासनाच्या कागदावर असते; दुष्काळाची तीव्रता मात्र शेतकऱ्याच्या रिकाम्या कोठारात आणि वाढलेल्या कर्जात दिसते. राजकारणात 'पॅकेज जाहीर' हा शब्द सहज वापरला जातो.

पण शेतकऱ्याच्या दृष्टीने पॅकेजची खरी किंमत ते प्रत्यक्ष लाभार्थ्यापर्यंत पोहोचल्यानंतरच ठरते. म्हणून आता सरकारने केवळ किती कोटींची मदत जाहीर केली यापेक्षा किती शेतकऱ्यांचे पंचनामे झाले? किती नुकसान नोंदवले गेले? किती लाभार्थी निश्चित झाले? किती रक्कम वितरित झाली? किती शेतकरी अजून प्रतीक्षेत आहेत? या प्रश्नांची जिल्हानिहाय आणि तालुकानिहाय माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे. दुष्काळ व्यवस्थापनातील पारदर्शकता ही केवळ प्रशासकीय गरज नाही; ती जनतेचा अधिकार आहे.

# आयुष्याचा वेग वाढला, पण हृदयाला विश्रांती मिळाली का?



पहाटे कोंबडा आरवतो आणि गाव जागं होतं. कुणी गोठ्याकडे धाव घेतं, कुणी चुल पेटवतं, कुणी शेताची वाट धरतं. घरातली आई डबा बांधते, मुलांना शाळेसाठी उठवते आणि स्वतःचा चहा कधी थंड झाला, हे तिलाही कळत नाही.शहरातही चित्र फार वेगळं नाही. अलार्म वाजतो, मोबाईल हातात येतो, कामाचे संदेश सुरू होतात आणि दिवसाची धावपळ सुरू होते.सगळ्यांसाठी वेळ असतोपण स्वतःसाठी?कदाचित नाही.एका साधारण मध्यमवयीन शेतकऱ्याला काही दिवसांपासून चालताना दम लागत होता. कधी छातीत जडपणा जाणवत होता. घरच्यांनी डॉक्टरांकडे जाण्याचा आग्रह केला. तो मात्र नेहमीप्रमाणे म्हणाला,''काही नाही कामाचा थकवा आहे. दोन दिवस आराम केला की बरं वाटेल.''कामं सुरूच राहिली. पण एक दिवस शरीराने दिलेला इशारा दुर्लक्षित करता आला नाही.ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट नाही. आपल्या आजूबाजूला अशा कितीतरी कथा आहेत. शरीर थांबण्याचा इशारा देत असताना आपण मात्र जीवनाच्या शर्यतीत धावत राहतो.आज २९ सप्टेंबरजागतिक हृदय दिन.हा दिवस केवळ हृदयविकाराबद्दल माहिती देण्याचा दिवस नाही; तर आपल्या जगण्याच्या पद्धतीकडे पुन्हा एकदा पाहण्याची संधी आहे.हृदय आपल्यासाठी थांबत नाही.आपण झोपतो, हृदय झोपत नाही.आपण काम करतो, हृदय काम करत राहतं.आपण आनंदी असतो, दुःखी असतो, तणावात असतोतरी हृदय आपलं काम करतच राहतं.आपल्या शरीरातील प्रत्येक भागापर्यंत रक्त आणि ऑक्सिजन पोहोचवण्याचं काम ते अविरतपणे करत असतं.मग प्रश्न एवढाच की,आपल्यासाठी क्षणभरही न थांबणाऱ्या हृदयासाठी आपण दिवसातून काही मिनिटं थांबू शकतो का?आधुनिक जीवनशैलीचा वेगआज माणसाचं आयुष्य पूर्वीपेक्षा अधिक वेगवान झालं आहे. कामाचा ताण, सततची धावपळ, अपुरी झोप, व्यायामाचा अभाव, तंबाखू आणि धूम्रपान, असंतुलित आहार, वाढतं वजन आणि मानसिक ताणया सगळ्या गोष्टी हृदयाच्या आरोग्यावर परिणाम करू शकतात.शारीरिक हालचाल कमी होत असताना मोबाईल आणि स्क्रीनसमोरचा वेळ मात्र वाढत चालला आहे.पूर्वी बाजारात जाण्यासाठी चालावं लागायचं; आज दारापर्यंत वाहन येतं.पूर्वी मोकळ्या वेळेत माणसं अंगणात, शेतात किंवा गावच्या रस्त्यावर चालायची; आज तोच वेळ स्क्रीनसमोर जातो.प्रगती झाली आहे, सुविधा वाढल्या आहेत; पण त्या सुविधांसोबत निष्क्रिय जीवनशैलीही वाढत आहे. हृदयविकाराबाबतचा सर्वात धोकादायक विचार कदाचित हाच आहे मला काही होणार नाही. हा गैरसमज रक्तदाब वाढलेला असू शकतो, रक्तातील साखर वाढलेली असू शकते किंवा कोलेस्टेरॉल वाढलेलं असू शकतं; पण सुरुवातीला त्याची स्पष्ट जाणीव प्रत्येकाला होईलच असं नाही.म्हणून आरोग्य तपासणी म्हणजे आजार असल्याची खूण नव्हे.कधी कधी ती आजार होण्यापूर्वी सावध होण्याची संधी असते.आपल्या वय, कौटुंबिक इतिहास आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रक्तदाब, रक्तातील साखर, कोलेस्टेरॉल, वजन आणि आवश्यक इतर तपासण्यांकडे लक्ष देणं महत्त्वाचं आहे.हृदयाची भाषा समजून घ्या छातीत दडपण किंवा वेदना, श्वास घेण्यास त्रास, अचानक घाम येणे, चक्कर येणे, मळमळ होणे किंवा वेदना हात, खांदा, जबडा अथवा पाठीकडे जाणे यांसारखी लक्षणे गंभीर असू शकतात.अशा वेळी ''थोड्या वेळाने बरं होईल'' म्हणून घरात बसणं धोकादायक ठरू शकतं.तातडीने वैद्यकीय मदत घेणं महत्त्वाचं आहे.कारण काही प्रसंगी उपचार मिळण्यास झालेला विलंबही अत्यंत महत्त्वाचा ठरतो.हृदयाची काळजी म्हणजे मोठी गोष्ट नाही हृदयासाठी आपण रोज काही साध्या गोष्टी करू शकतो. दररोज आपल्या क्षमतेनुसार शारीरिक हालचाल करणे.आहारात भाज्या, फळे आणि पौष्टिक पदार्थांना स्थान देणे.मीठ, साखर आणि अतितेलकट पदार्थांचं प्रमाण मर्यादित ठेवणे.तंबाखू आणि धूम्रपानापासून दूर राहणे.पुरेशी झोप घेणे.ताण कमी करण्यासाठी स्वतःसाठी वेळ देणे.आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजेशरीर देत असलेले संकेत दुर्लक्षित न करणे.हे बदल छोटे वाटतात.पण अनेकदा मोठ्या संकटापासून वाचवणारी सुरुवात अशाच छोट्या सवयींपासून होते.

ग्रामीण भारतातील गावाकडच्या माणसासाठी आरोग्याचा प्रश्न आणखी वेगळा आहे.दिवसभर शेतात काम करणारा शेतकरी स्वतःला ''आपण तर दिवसभर काम करतो'' म्हणून व्यायामाची गरज नाही असं मानू शकतो. घरातील महिला मात्र दिवसभर घरकाम, पाणी भरणं, शेती आणि कुटुंबाची जबाबदारी सांभाळूनही स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू शकते.अनेकदा घरातील प्रत्येक व्यक्तीची काळजी घेताना घरातील स्त्री स्वतःला शेवटी ठेवते.आरोग्याबाबतची जागरूकता म्हणजे केवळ शहरातील जिम, महागडी तपासणी किंवा मोठमोठ्या आरोग्य मोहिमा नव्हेत.ती गावच्या चौकातून, शाळेतून, अंगणवाडीतून, आरोग्य केंद्रातून आणि प्रत्येक घरातून सुरू होऊ शकते.हृदयाला फक्त औषध नव्हे, सवयीही हव्यात आज आपण आजार झाल्यावर डॉक्टर, औषधं आणि रुग्णालय शोधतो.पण आरोग्य टिकवण्यासाठी डॉक्टरांची गरज पडण्यापूर्वीच आपण स्वतःशी संवाद साधायला हवा.मी काय खातो?मी किती चालतो?माझी झोप किती आहे?माझ्यावर किती ताण आहे?मी तंबाखू किंवा धूम्रपान करतो का?माझा रक्तदाब मला माहीत आहे का?माझ्या शरीराने दिलेला इशारा मी ऐकतोय का?हे प्रश्न साधे आहेत.पण कदाचित त्यांची उत्तरं आपल्या आयुष्याची दिशा बदलू शकतात.थोडं थांबूयाआपण आयुष्यभर धावत राहतो.पैशासाठी धावतो.यशासाठी धावतो.स्वप्नांसाठी धावतो.कुटुंबासाठी धावतो.पण या सगळ्या धावपळीत ज्याच्या जोरावर आपण हे सगळं करतो, त्या हृदयासाठी मात्र वेळ काढत नाही.म्हणून या जागतिक हृदय दिनी एक दिवस तरी स्वतःला विचारूया जग जिंकण्याच्या नादात मी माझं आरोग्य तर हरवत नाही ना?थोडं थांबूया.काही क्षण शांत बसूया.

आपल्या शरीराचं ऐकूया.हृदयाची धडधड जाणवू देऊया.कारण हृदय आपल्याशी बोलत असतंफक्त आपण ऐकायला थांबले पाहिजे.आयुष्याच्या शर्यतीत पुढे जाणं महत्त्वाचं आहे;पण त्या शर्यतीत हृदयाचा ठोका कायम राहणं त्याहून महत्त्वाचं आहे.या जागतिक हृदय दिनी एक संकल्प करूया हृदयासाठी वेळ देऊया, आरोग्यासाठी वेळ देऊया आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे स्वतः साठी वेळ देऊया.



**-परमेश्वर घुंगासे**
**जालना**
**मो.९६२३११५४९६**

पान १ वरुन...

### राहुल गांधींचा...

अहवाल यांच्यातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म क्रमांक ६च्या मुद्द्यावरही दानवे यांनी विरोधकांवर टीका केली. ''सर्वोच्च न्यायालयाने ज्या फॉरमॅटमध्ये फॉर्म क्रमांक ६ वैध ठरवला आहे, त्याच फॉरमॅटमध्ये तो वापरला जात आहे. त्यामुळे या मुद्द्यावर संभ्रम निर्माण करणे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबतही जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न आहे,'' असे ते म्हणाले. निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर मतदार सेवा आणि मतदार नोंदणीसंदर्भातील सुविधा उपलब्ध असून, मतदारांना आपली नोंदणी व तपशील तपासण्याची सुविधाही आयोगाने उपलब्ध करून दिली आहे. 'काँग्रेस जिंकली की आयोग चांगला, भाजप जिंकली की आरोप का?' निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरून काँग्रेसकडून करण्यात येणाऱ्या आरोपांवर दानवे यांनी प्रश्न उपस्थित केला. ''तेलंगणा, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटकात विजय मिळाला तेव्हा हा निवडणूक आयोग चांगला होता. मग भाजप विजयी झाल्यानंतर त्याच निवडणूक आयोगावर प्रश्न का उपस्थित केले जातात?'' असा सवाल त्यांनी केला. प्रत्येक निवडणुकीतील पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडण्यापेक्षा राजकीय पक्षांनी जनतेमध्ये जाऊन आपल्या कामाचे आणि भूमिकेचे आत्मपरीक्षण करावे, असेही दानवे म्हणाले. ''जनतेचे प्रश्न घेऊन जनतेमध्ये गेल्यास जनता तुमच्या पाठीशी येईल. जनतेने नाकारले असेल तर त्याची कारणे शोधण्याची गरज आहे,'' असे त्यांनी सांगितले. ईव्हीएमच्या मुद्द्यावरूनही दानवे यांनी विरोधकांवर निशाणा साधला. ईव्हीएमबाबत सातत्याने आरोप करण्यात आले; मात्र आता निवडणूक आयोगालाच लक्ष्य केले जात असल्याचे त्यांनी म्हटले. निवडणूक आयोगाने ईव्हीएमबाबत आव्हान दिले होते आणि ते सिद्ध करण्यासाठी कोणीही पुढे आले नसल्याचा दावा दानवे यांनी केला. ''आता ईव्हीएमचा मुद्दा सोडून निवडणूक आयोगालाच घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे अतिशय चुकीचे आहे,'' असे ते म्हणाले. 'व्होटचोरी'च्या आरोपावर उपरोधिक टीका करताना दानवे यांनी अत्यंत आक्रमक शब्दांत विरोधकांवर निशाणा साधला. ''व्होटचोरीचा आरोप करणाऱ्यांनी आधी आत्मपरीक्षण करावे. त्यांचा मेंदूच चोरीला गेला आहे,'' अशी टीका त्यांनी केली. याच संदर्भात त्यांनी पंतप्रधानांकडे उपरोधिक मागणी करत, ''यांचा चोरी गेलेला किंवा गहाण ठेवलेला मेंदू परत मिळवून देण्यासाठी एखादी कमिटी तयार करता येईल का?'' असा टोला लगावला. एस आर आय प्रक्रियेत मतदारसंख्या मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचा दावा होत असलेल्या पश्चिम बंगालमधील १५ मतदारसंघांचा संदर्भ देत दानवे यांनी विरोधकांच्या आरोपांवर प्रश्न उपस्थित केला. ''जर वगळलेले मतदार मोठ्या प्रमाणात भाजपचेच होते, असा दावा केला जात असेल, तर त्या मतदारसंघांमध्ये तृणमूल काँग्रेस कशी निवडून आली, हा प्रश्नही विचारला पाहिजे,'' असे ते म्हणाले. त्यांच्या मते, मतदार याद्या अचूक करण्यासाठी अशा प्रकारच्या पुनरिक्षणाची आवश्यकता आहे. २००४ मध्येही  झाल्याचा संदर्भ देत त्यांनी ही प्रक्रिया नियमितपणे झाल्यास मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्यास मदत होईल, असे सांगितले. महाराष्ट्रातील मतदार याद्यांच्या प्रश्नावर बोलताना दानवे यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील परिस्थिती वेगळी असल्याचे सांगितले. ''ग्रामीण भागात वगळलेली किंवा न सापडलेली नावे तुलनेने कमी आहेत. मात्र शहरांमध्ये स्थलांतर मोठ्या प्रमाणात असल्याने हा प्रश्न अधिक आहे,'' असे ते म्हणाले. अनेक नागरिकांचे नाव मूळ गावातील मतदार यादीत तसेच ते वास्तव्यास असलेल्या शहरातील मतदार यादीत राहण्याची शक्यता असल्याने मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाची प्रक्रिया महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. मतदार याद्या शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत सर्व राजकीय पक्षांना सहभागी होण्याची संधी असल्याचे दानवे यांनी सांगितले. ''ज्या पद्धतीने आम्ही आमचे  तयार केले आहेत, असे त्यांनी सांगितले. निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावर -२०२६ तसेच मतदार यादी आणि मतदार सेवा यासंदर्भातील सुविधा उपलब्ध असल्याचे आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळावर नमूद आहे. ''भारताचे संविधान आणि संविधानाने निर्माण केलेल्या संवैधानिक संस्था अबाधितच राहतील. कितीही प्रयत्न केले तरी भारतात साम्यवादी राजवट आम्ही आणू देणार नाही. संवैधानिक संस्थांना बदनाम करण्याची मोहीम यशस्वी होणार नाही,'' असा दावा त्यांनी केला. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवरून काँग्रेस आणि विरोधकांकडून उपस्थित केलेले प्रश्न आणि आयोगाने दिलेले स्पष्टीकरण यामुळे हा मुद्दा सध्या देशाच्या राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. राहुल गांधी यांनी मतदार प्रक्रिया आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत, तर भाजपने हे आरोप फेटाळून लावले आहेत.

### नागेश आडगावकरांच्या...

त्यांच्या प्रत्येक सादरीकरणाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद देत टाळ्यांचा कडकडाट केला.

या सुरेल मैफिलीत रोहित खवले (पखवाज), वेदांत कुलकर्णी (तबला), डॉ. प्रसाद चौधरी (संवादिनी), पंकज शिरभाते (व्हायोलिन) आणि निरंजन भालेराव (बासुरी) यांनी अप्रतिम साथसंगत करून कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवी उगले यांनी केले, तर डॉ. सुजाता देवरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्रीनिवास भक्कड, उपाध्यक्ष फुलचंद भक्कड, उद्योजक सुनील रायठ्ठा, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. विनायक सेवलीकर, संजय परळीकर, सुभाष कुलकर्णी, अरविंद देशपांडे, नितीन देशमुख, सौ. किरण देशपांडे, विनायक कुलकर्णी, शाहीर आप्पासाहेब उगले, डॉ. यशवंत सोनुने, प्रा. कल्याण उगले यांच्यासह शहरातील संगीतप्रेमी व रसिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अपुऱ्या पावसामुळे...

मत्स्यउत्पादनावरही त्याचा गंभीर परिणाम झाला असून, गेल्यावर्षीच्या ७९ टक्के मत्स्यउत्पादनाच्या तुलनेत यंदा हे उत्पादन केवळ २० टक्क्यांपर्यंत घसरले आहे. या पार्श्वभूमीवर तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशा सूचना मंत्री नितेश राणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच नुकसानग्रस्त मच्छीमारांचे पंचनामे करून, शेतकऱ्यांप्रमाणेच त्यांनाही शासनाच्या माध्यमातून आवश्यक मदत मिळवून देण्यासाठी लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तलावातील मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी तसेच मच्छीमारांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाच्या मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजनेची माहितीही यावेळी मच्छीमार बांधवांना देण्यात आली. या योजनेचा अधिकाधिक लाभ घेऊन उपलब्ध शासकीय योजनांचा उपयोग करून घेण्याचे आवाहन मंत्री नितेश राणे यांनी केले. यावेळी आमदार नारायण कुचे, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, मत्स्य आयुक्त भानुदास पालवे, सहाय्यक आयुक्त (भूजल) ऋता दिक्षित, प्रादेशिक आयुक्त, छत्रपती संभाजीनगर सुरेश भारती, सहाय्यक आयुक्त मधुरिमा जाधव यांच्यासह मत्स्यव्यवसाय व पाटबंधारे विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### दलित-आदिवासींच्या...

उतारे देऊन जमिनीवरील हक्क निश्चित करावा, अशी मागणीही मोर्चाच्या माध्यमातून करण्यात आली. यावेळी ॲड. भास्करराव मगरे म्हणाले की, वर्षानुवर्षे जमिनीवर कष्ट करून शेती करणाऱ्या भूमिहीन कास्तकारांना अद्यापही जमिनीच्या मालकीचा अधिकृत हक्क मिळालेला नाही. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या कास्तकारांच्या जमिनीचा प्रश्न शासनाने गांभीर्याने सोडवून त्यांना सातबारा उतारे देण्याची कार्यवाही करावी. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातील वंचित घटकांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत देण्याबरोबरच रोजगाराची साधने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणीही मगरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. दलित आणि आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांवर शासनाने केवळ आश्वासने न देता ठोस निर्णय घ्यावेत. प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करून वंचित समाजाला न्याय द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली. या मोर्चात शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे, जिल्हा सचिव जय खरात, उपजिल्हाप्रमुख अण्णासाहेब बाळराज, प्रल्हाद साळवे, आकाश निकाळजे,विलास खरात, संदीप काकडे, सुनील निर्मळ, बाळासाहेब बोबडे, नाना राजगिरे, बाळासाहेब भांदर्गे, बाळासाहेब गाडेकर, विष्णु शिंदे, दशरथ

तांबे, भाऊसाहेब पांजगे, विजय मोरे, गोरख खरात, बाबुराव साबळे, दिलीप पटेकर, सुभाष वाघमारे, गणेश खरात यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाच्या माध्यमातून दलित, आदिवासी आणि भूमिहीन कास्तकारांच्या प्रश्नांना पुन्हा एकदा ऐरणीवर आणण्यात आले असून, शासन आणि प्रशासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी ॲड. भास्कर मगरे यांनी केली.

### बोगस डॉक्टरांवर...

एनएस१ अँटीजेन चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १७ चाचण्यांचे अहवाल पॉझिटिव्ह आले आहेत. मात्र, विविध ठिकाणी घरांमध्ये साचलेल्या पाण्यात डासांच्या अळ्या आढळण्याचे प्रमाण वाढत असल्याने नागरिकांनी खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. डासांचे जीवनचक्र तोडण्यासाठी साचलेले पाणी तातडीने हटविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. डेंग्यूचे हॉटस्पॉट शोधून त्या ठिकाणी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले आहेत. डेंग्यू संशयित तसेच बाधित रुग्णांची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देणे खासगी रुग्णालयांना बंधनकारक करण्यात येणार आहे. ताप असलेल्या डेंग्यू संशयित रुग्णांची रॅपिड डेंग्यू चाचणी करून त्याचे अहवाल संबंधित आरोग्य अधिकाऱ्यांना कळवावे लागणार आहेत. तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी आपापल्या तालुक्यातील रुग्णालयांना नियमित भेटी देऊन तपासणी व सनियंत्रण करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. खासगी रुग्णालयांकडून गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तसेच बोगस डॉक्टरांची यादी तयार करून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांशी समन्वय साधून फॉगिंग मोहीम राबवावी. ग्रामपंचायत आणि नगरपरिषदांनी नाल्यांची स्वच्छता, नियमित व स्वच्छ पाणीपुरवठा तसेच धूरफवारणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.डेंग्यू प्रतिबंधासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या उद्देशाने तालुका आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून माहिती तयार करून ती प्रसारित करावी. प्रसारमाध्यमांतूनही नागरिकांना काय करावे आणि काय करू नये, याबाबत माहिती देण्यात यावी.  घरातील पाण्याचे साठे झाकून ठेवावेत. छतावरील जुने टायर, प्लास्टिकच्या बाटल्या, नारळाच्या करवंट्या आदी वस्तूंमध्ये पाणी साचणार नाही, याची काळजी घ्यावी. अचानक तीव्र ताप, डोकेदुखी, डोळ्यांच्या मागे दुखणे, सांधेदुखी किंवा अंगावर लाल पुरळ अशी लक्षणे आढळल्यास स्वतःहून औषधे न घेता तातडीने शासकीय रुग्णालयात तपासणी करून घ्यावी. उपचार केवळ नोंदणीकृत डॉक्टरांकडूनच घ्यावेत. बोगस डॉक्टरांबाबत तक्रार असल्यास तालुका आरोग्य अधिकारी किंवा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### धोकादायक आणि...

ना-हरकत दिली असल्याचा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. तसेच घरमालकाने दाखल केलेला निष्कासनाचा दावा न्यायालयाने यापूर्वीच फेटाळल्यामुळे दिवाणी न्यायालयातून बेकायदेशीरपणे बेदखल न करण्याचे संरक्षण मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.

मात्र, वीज वितरण कंपनीने या याचिकेला कडाडून विरोध केला. संबंधित इमारत महापालिकेने अत्यंत धोकादायक जाहीर करून ती पाडण्याचे आदेश दिलेले आहेत, अशी माहिती कंपनीने न्यायालयाला दिली. यापूर्वी याच इमारतीतील अन्य एका भाडेकरूने पाडकामाच्या आदेशाला आव्हान दिले होते; तेव्हा या इमारतीचा एक भाग आधीच कोसळला असून उर्वरित भागही कधीही कोसळण्याच्या स्थितीत असल्याचे नमूद करत उच्च न्यायालयाने पाडकामाचे आदेश कायम ठेवले होते. न्यायमूर्ती राय यांनी सुनावणीदरम्यान स्पष्ट केले की, विद्युत कायदा २००३ मधील कलम ४३ अन्वये वीजपुरवठ्याची तरतूद असली, तरी ती सुरक्षिततेच्या अटींच्या अधीन आहे. केवळ भाडेकरूचे अधिकार टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत जीर्ण आणि पडायला आलेल्या इमारतींना तसेच उभे राहू देता येणार नाही. ज्या ठिकाणी जीवितहानीचा मोठा धोका आहे, तिथे वीजपुरवठा सुरू करण्याचे आदेश देणे सर्वथा अयोग्य ठरेल, असे स्पष्ट करत न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. अधिवक्ता महेश एस. धनावत यांचे मतः या निकालावर प्रतिक्रिया देताना विधिज्ञ ॲड. महेश एस. धनावत म्हणाले की, ''हा न्यायनिर्णय धोकादायक, मोडकळीस आलेल्या अथवा असुरक्षित इमारतींमध्ये जीव मुठीत धरून राहणाऱ्या किंवा व्यवसाय करणाऱ्या नागरिकांसाठी डोळे उघडणारा ठरणार आहे. हक्कांपेक्षा नागरिकांचा जीव आणि सुरक्षा सर्वोच्च असते, हेच या निकालातून अधोरेखित झाले आहे. भविष्यातील दुर्घटना आणि जीवितहानी टाळण्यासाठी आता स्थानिक महानगरपालिकांनी स्वतःहून पुढाकार घ्यायला हवा. शहरांमधील सर्व धोकादायक व पाडण्यास पात्र इमारतींची यादी तयार करून, अशा इमारतींचा वीजपुरवठा तत्काळ खंडित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने राज्य वीज वितरण मंडळाला अधिकृत पत्र पाठवून तातडीची कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे.''

### ज्ञानेश कुमार...

पद्धतीने वगळले जाऊ नये, या मागण्यांवर जोर दिला. आंदोलनकर्त्यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळातील निर्णय आणि भूमिकेची चौकशी करण्याची मागणी केली.  प्रक्रियेबाबत काँग्रेसने गंभीर आक्षेप नोंदवत या संपूर्ण प्रक्रियेची स्वतंत्र, निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार,  प्रक्रियेमुळे पात्र मतदारांचे नाव कोणत्याही कारणामुळे मतदार यादीतून वगळले जाणार नाही, याची हमी देणे आवश्यक आहे. मात्र, आंदोलनादरम्यान आपत्कालीन सेवांना अडथळा निर्माण होऊ नये, याची काळजी घेतल्याचा दावा काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला. काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ताब्यात घेतल्यानंतर काही कार्यकर्त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी नेण्यात आले आणि त्यानंतर जालना तालुका पोलीस ठाण्यात आणण्यात आले. काही वेळानंतर त्यांना सोडून देण्यात आले. आंदोलनानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या माध्यमातून आपले निवेदन प्रशासनाकडे सुपूर्द केले. निवेदनात  प्रक्रियेची स्वतंत्र चौकशी करण्यासह मतदार याद्यांमध्ये पारदर्शकता राखण्याची मागणी करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळात झालेल्या निवडणुकांची स्वतंत्र चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी केली. विशेषतः बिहार आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांबाबत काँग्रेसने प्रश्न उपस्थित करत या निवडणुकांची स्वतंत्र चौकशी करून आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी, अशी मागणी केली. भारत निवडणूक आयोगाच्या सध्याच्या नोंदीनुसार ज्ञानेश कुमार हे १९ फेब्रुवारी २०२५ रोजी भारताचे २६वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून पदभारावर आले. आयोगाच्या माहितीनुसार त्यांच्या कार्यकाळात लोकसभा तसेच जम्मू-काश्मीर, हरियाणा, महाराष्ट्र, झारखंड आणि दिल्ली विधानसभा निवडणुकांसह विविध निवडणूक प्रक्रिया पार पडल्या आहेत.  या आंदोलनाला काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये अंकुशराव राऊत, सुभाष कोळकर, शांतीलाल बनसोडे, अशोक उबाळे, डॉ. सुभाष ढाकणे, सुनील चौधरी, रऊफ परशुवाले, राम कुराडे, लक्ष्मण म्हसलेकर, राहुल देशमुख, अजय बनकर, कृष्णा पडुळ, देवराज डोंगरे, कल्याण तारडे, राजेंद्र गोरे, संजय मुथा, संजय इंगळे, बालासाहेब आकात, जाकीर डावरगावकर, अजित चाऊस, योगेश कदम, प्रमोद आल्लाख, सागर चौधरी, भागवत घाटे, जावेद बेग, नारायण वाडेकर, बाबासाहेब सोनवणे, रघुवीर गुडे, सोपान तिरुके, माऊली इंगोले, करीम बिल्डर,  राजाभाऊ कुलकर्णी, ॲड. राम गव्हाणे, संजय बागल, वसीम शेख, योगिता धांडगे आदींचा समावेश होता.

# उजेड पेरणारी माणसं : सकारात्मकतेचा संदेश देणारे व्यक्तिचित्रण

बदलत्या काळासोबत मानवी जीवन कमालीचे आत्मकेंद्री आणि गतिमान झाले आहे. आजच्या या धावपळीच्या आणि भौतिकवादी युगात स्वच्या पलीकडे जाऊन समाजाचा विचार करणारे लोक दुर्मिळ होत चालले आहेत. अशा काळात, अवतीभवती पसरलेल्या नैराश्याच्या अंधाराला छेद देऊन इतरांच्या आयुष्यात आशेचा किरण दाखवणारी काही निस्वार्थी माणसे आजही समाजात अस्तित्वात आहेत. अशाच काही मूकसेवकांच्या, पडद्यामागच्या खऱ्या नायकांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासावर प्रकाश टाकणारे अत्यंत वाचनीय आणि संग्राह्य पुस्तक म्हणजे उजेड पेरणारी माणसं.




जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथील लेखक दिव्य मराठी वृत्तपत्राचे वृत्त संपादक पत्रकार आनंद पाटील लिखित हा ग्रंथ म्हणजे केवळ काही व्यक्तींचित्रण नसून, ती माणुसकीची आणि निस्वार्थी सेवा आहे. पुण्याच्या पेन पब्लिशिंग हाऊस ( ) या नामांकित प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रकाशित केले असून, मराठी साहित्य जगतात आणि वाचकांमध्ये या पुस्तकाने अल्पावधीतच आपले एक विशेष स्थान निर्माण केले आहे. पुस्तकाचा मध्यवर्ती विचार आणि आशय उजेड पेरणारी माणसं या शीर्षकातच आहे. या पुस्तकाचा संपूर्ण गाभा आणि लेखकाचा उदात्त दृष्टिकोन सामावलेला आहे. शेतकरी ज्याप्रमाणे शेतात धान्य पेरतो आणि त्यातून संपूर्ण जगाची भूक भागते, अगदी त्याचप्रमाणे समाजात अशी काही माणंस असतात जी स्वतःच्या कष्टांतून, त्यागातून आणि सेवेतून लोकांच्या आयुष्यात आनंदाचा आणि ज्ञानाचा उजेड पेरतात. या पुस्तकात लेखकाने अशा तब्बल ८४ निस्वार्थी आणि कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा वेध घेतला आहे. ही ती माणसे आहेत, ज्यांनी कधीही प्रसिद्धीच्या झगमगाटाची अपेक्षा ठेवली नाही, कोणत्याही पुरस्काराची हाव धरली नाही किंवा प्रसारमाध्यमांमध्ये चमकण्याचा प्रयत्न केला नाही. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, स्वतःचे वैयक्तिक दुःख आणि अडचणी बाजूला सारून ही माणसे समाजाच्या कल्याणासाठी झटत राहिली. समाजात वावरताना लेखकाला जी माणसे भेटली, ज्यांच्या कार्याने लेखक प्रभावित झाले आणि ज्यांच्या जगण्यातून समाजाला काहीतरी दिशा मिळू शकते, अशा निवडक माणसांची यशोगाथा लेखकाने या २५६ पानांच्या पुस्तकात अतिशय समर्थपणे मांडली आहे. विविध क्षेत्रांतील कर्तृत्वाचा वेध या पुस्तकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य. म्हणजे यात समाविष्ट असलेल्या व्यक्तींची विविधता होय. लेखकाने केवळ एकाच क्षेत्रापुरते मर्यादित न राहता शिक्षण, क्रीडा, कला, साहित्य, कृषी आणि आरोग्य,सामाजिक कार्य, अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींची निवड केली आहे.

यामध्ये क्रीडा क्षेत्रासाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेणारे अरुण मांडळकर यांच्यासारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा समावेश आहे, ज्यांनी अनेकांचे क्रीडा जीवन घडवले. त्याचप्रमाणे दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहोचवणाऱ्या ज्ञानसेविका, अपंगांच्या आयुष्याला अर्थ प्राप्त करून देणारे सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरण रक्षणासाठी झटणारे निसर्गप्रेमी आणि गोरगरिबांना वैद्यकीय मदत मिळवून देणारे देवदूत अशा अनेकविध व्यक्तिमत्त्वांचा परिचय या पुस्तकात करून देण्यात आला आहे. ही सर्व माणसे आपल्याच अवतीभवती राहणारी, सामान्य कुटुंबातून आलेली आहेत; परंतु त्यांच्या ध्येयवेड्या आणि असामान्य कर्तृत्वामुळे ती कशी महान ठरली, याचे जिवंत दर्शन हे पुस्तक घडवते

चित्रकार पिसुर्वो म्हणजे जितेंद्र सुरळकर यांनी क्यूबिझम मॉडर्न आर्ट चित्रशैलीत वेगळा ठसा उमटवला आहे. १४ देशात त्यांची चित्र प्रदर्शने लागली आहे. मलेशिया इंग्लंड येथे चित्र प्रदर्शन लवकर भरणार आहे जामनेर तालुक्यातील सोनारी त्यांचे गाव.खिरोद्याच्या सप्तपुट कला महाविद्यालयात चित्रकलेचे धडे गिरवले. आर्टिस्ट गुलजार गवळी, प्रकाश तांबटकर हे त्यांचे गुरु. काळा घोडा आर्ट फेस्टिवल मध्ये एका दिवसभरात पेन्सिलने ९० पोर्ट्रेट काढले. २००५ च्या मुंबई पावसाने महाप्रलय झाला चित्रे आणि पन्नास कॅनवास नष्ट झाली. लंडन, आयर्लंड, कुवेत, मलेशिया, पॅरिस, श्रीलंका, कोरिया, दुबई, सिंगापूर, आफ्रिका, बांगलादेश आधी ठिकाणी त्यांची चित्र प्रदर्शने झाली आहेत.

पिशवी वाली बाई शैला सावंत यांनी कापडी पिशवी वापरा ही साधी पण प्रभावी टॅग लाईन घेऊन शैला सावंत यांनी आपली मोहीम सुरू केली. दर रविवारी दिपनगर वसाहतीत आठवड्या बाजार भरत असे, त्या दिवशी सावंत या आपल्या काही सहकार्यासह या प्रवेशद्वारा जवळ उभे राहत.व ज्या व्यक्ती जवळ प्लास्टिकची कॅरीबॅग दिसेल त्याला प्रेमाने समजावून प्लास्टिक पिशवी जमा करून त्या बदल्यात साड्या पासून शिवलेली आकर्षक पिशवीत या व्यक्तीला देत होत्या. कुठे व्याख्यान असेल तर त्या व्याख्यानाचे मानधन म्हणून आवाहन करत होत्या की मला जुन्या साड्या द्या. त्यापासून त्या एका साडीच्या पंधरा पिशव्या तयार करतात. गेल्या आठ वर्षात त्यांनी तब्बल १३००० पेक्षा जास्त पिशव्याचे वाटप केले. त्या उत्तम कलाकार आणि लेखिका ही आहेत.

फळभाज्यांच्या बिया फेकून न देता त्या जपून ठेवणे सुकवणे आणि गरजूंना त्याचे वाटप करणे असा उपक्रमही त्यांनी केला. उपदेश न करता त्यांनी स्वतः पासून या कार्याला सुरुवात केली हे महत्त्वाचे. वेटर ते डॉक्टर युवराज पवार असा प्रवास करणारे पवार हे जामनेर तालुक्यातील कापूस वाडी येथील रहिवासी. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत माध्यमिक व उच्च शिक्षण पुर्ण केले.

वसंत चव्हाण नूतन मराठा विद्यालयातील प्राध्यापक साहित्य आणि सामाजिक कार्यात अग्रेसर.

डॉक्टर व्ही.आर पाटील.पाळधी.

मनोज पांडव भुसावळ येथील कष्टकरी कुटुंब. रेल्वे स्टेशन सफाई कामगार. रेल्वे स्टेशन अभियान, प्रवासी पंधरवडा, कचराकुंडीत कचरा टाकण्याबद्दल प्रबोधन. आंबेडकर चळवळीचे कार्यकर्ते. वयाच्या ५२ व्या निधन.

चाळीसगावचे डॉक्टर वीरा राठोड लोककला लोकभाषा लोकसाहित्य बोलीभाषांचे संशोधन. साहित्य अकादमी युवा पुरस्कार २०१५ मिळाला.

डॉक्टर अशोक कोळी जामनेर. महात्मा फुले यांच्या तत्त्वज्ञानाचा मराठी साहित्यावर पडलेला प्रभाव. हा विषय पीएचडी साठी होता. प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण.. आई वडील शेतीत मजूरी करायचे, परंतु मुलाने शिकावे ही इच्छा. कविता कथासंग्रह प्रसिद्ध. शेतकऱ्यांच्या भावना, समस्या कथा कविता कादंबरीतून मांडल्या. समाज जीवनाचा जवळून अभ्यास. अशाने असं होतं हे पुस्तक.

नामदेव कोळी कडगाव जळगाव.गुराखी.. शेतमजूर. तासिका तत्वावर प्राध्यापक असा प्रवास प्रतिकूल परिस्थितीत मार्गक्रमण करत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन भाषा संचनालयात अनुवादक म्हणून नोकरी करत आहे.काढत असलेला वाघूर दिवाळी अंक महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचला.

म.सी हळपे के.नारखेडे विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक.उद्योजक अरुण नारखेडे. प्रेमचंद कोटेचा.

शंभू पाटील, पांडुरंग घांग्रेकर, सीमा भारंबे.दिलीप घोडेस्वार, याबरोबरच इतरांचे कार्याविषयी जाणून घेण्यासाठी आपल्याला पुस्तकच वाचायला हवे.

आनंदा पाटील पत्रकार आणि संवेदनशील लेखक असल्यामुळे त्यांच्या लेखणीत एक वेगळीच ताकद आणि धार आहे. या पुस्तकातील प्रत्येक व्यक्तिचित्र वाचताना ते वाचकांच्या मनाला थेट भिडते. लेखकाची भाषा अतिशय ओघवती, सोपी, सुबोध आणि संवेदनक्षम आहे. कुठेही शब्दांचा अवाजवी बडेजाव नाही, क्लिष्ट अलंकार नाहीत किंवा व्यक्तीचे उदात्तीकरण करण्याचा अतिरंजित प्रयत्न नाही. अत्यंत वास्तववादी आणि संयत भाषेमध्ये लेखकाने प्रत्येक व्यक्तीचा संघर्ष आणि त्यांचे कार्य वाचकांसमोर ठेवले आहे. पुस्तकाच्या सुरुवातीला लेखकाने लिहिलेले अंतरीची ओल हे मनोगत वाचकांच्या काळजाला स्पर्श करून जाते. पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे. या मनोगतातून लेखकाची समाजाप्रती असलेली तळमळ आणि या पुस्तकामागची नेमकी भूमिका स्पष्ट होते. प्रत्येक प्रकरणाची सुरुवात आणि शेवट प्रभावी आहे. वाचक एकामागून एक प्रकरण वाचत जातो आणि पुस्तक केव्हा संपते, हे त्याचे त्यालाच समजत नाही. पुस्तकाचे मुखपृष्ठ आकर्षक आहे.

आजच्या तरुण पिढीसमोर आदर्श कोणाचा ठेवावा, असा मोठा प्रश्न आहे. इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या आभासी दुनियेत वावरणाऱ्या तरुणाईला वास्तवातील खऱ्या हिरोंची ओळख करून देण्याचे फार मोठे काम या पुस्तकाने केले आहे. उजेड पेरणारी माणसं हे पुस्तक केवळ वाचून विसरून जाण्यासारखे नाही, तर ते आत्मचिंतन करायला लावणारे आहे. ''आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो'' या भावनेची रुजवणूक हे पुस्तक वाचकांच्या मनात करते. जीवनात कितीही संकटे आली, तरी खचून न जाता सकारात्मकतेने कसे उभे राहायचे आणि इतरांच्या जीवनात प्रकाश कसा आणायचा, हा सर्वात मोठा संदेश मिळतो. आनंदा पाटील यांनी अशा व्यक्तींना या पुस्तकाच्या माध्यमातून संपूर्ण समाजापर्यंत पोहोचवले आहे यातील अनेकांची नावे सुध्दा खूप लोकांना माहीत नव्हते. आनंदा पाटील यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जिल्हा जळगाव.**
**सध्यानांदेड सिटी. पुणे.**
**८९९९५६६९१७**

# नागपूरातील पितृपक्षातील हाडपक्या गणपती उत्सव देशाचा ऐतिहासिक वारसा

हाडपक्या गणपती ज्याला आपण मस्कऱ्या गणपती असेही म्हणतो.याची सुरुवात इ.स. १७८७ मध्ये झाली. नागपूरचे भोसले घराण्यातील राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले (उर्फ चिमणाबापू) यांनी या अनोख्या ऐतिहासिक उत्सवाची सुरुवात केली आणि या उत्सवाला २३९ वर्षे पूर्ण होत आहे. पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते.परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २३९ वर्षांपासून हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो.यामागे सुध्दा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे.नागपूरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे हाडपक्या गणपती. हा उत्सव गणेशेत्सव संपल्यानंतर सुरू होतो.नागपूरसह विदर्भातील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. हा गणपती उत्सव घरघुती स्वरूपाचा नसुन सार्वजनिक स्वरूपाचा असतो.विदर्भात पितृपक्षाला हाडपक म्हटले जाते, या काळात नागपूरच्या ऐतिहासिक भोसले राजवाड्यात जो हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव साजरा केला जातो, त्या गणपतीच्या मूर्तीला पारंपरिकपणे शिल्परचनांनुसार १८ हात असतात म्हणजेच १८ रूपे हा या मागचा उद्देश;अठरा हातांचे विशेष रहस्य महालक्ष्मी आणि विघ्नेश्वर रूप: काही विशिष्ट प्राचीन शिल्पकलांमध्ये किंवा संयुक्त स्वरूपाच्या मूर्तींमध्ये महालक्ष्मी जिचे १४ हात मानले जातात आणि गणपतीचे ४ हात यांचे एकत्रित रूप दर्शवले जाते.एकत्रित हात: या संयुक्त स्वरूपात एकूण १८ हात हाडपक्या गणपतीला असतात म्हणजे संपूर्ण शक्ती गणरायामध्ये सामावलेली असते. म्हणजे सर्व रूपांनी नटलेला विघ्नहर्ता गणराया.पुर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिकरीत्या हा उत्सव साजरा होत असत. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात ''पितृपक्षाला'' ''हाडपक'' असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला''हाडपक्या गणपती''असेही संबोधले जाते.राजे भोसले यांचे नागपूरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली.भाद्रपद



शुद्ध चतुर्थीला घरगुती गणेशोत्सवाला सुरुवात होते व याला मोठे सार्वजनिक स्वरूप सुध्दा दिले जाते आणि हा उत्सव दहा दिवस चालतो. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते.नागपूरकर भोसले घराण्यातील श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले (चिमणा बापू) हे बंगालच्या स्वारीवर गेले होते आणि त्यांच्या परतीच्या प्रवासात म्हणजे १७८७ मध्ये नागपुरात हाडपक्या गणपती उत्सवाची परंपरा सुरू झाली आज या उत्सवाला २३९ वर्षे पूर्ण होत आहेत. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपती उत्सव साजरा करू शकले नाही. त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्टी चतुर्थी) ला गणपती उत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले.तेव्हा पासून हाडपक्या गणपतीला सुरूवात झाली आहे.त्यामुळे याला विजयत्सोव सुध्दा म्हणता येईल.याकाळात लावण्या,नकला, भारूड,खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे.यावेळी अनेक गंमती-जमतीचे कार्यक्रम होत असत त्यात थट्टा, मस्करी,नाटक खडी गंमत इत्यादीं मनोरंजनात्मक कार्यक्रमाचा भडीमार होत असत म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातुनच ''मस्कऱ्या'' हे स्थानीय बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला 'मस्कऱ्या गणपती नावाने प्रसिद्धी मिळाल्याचे सांगितले जाते.असे म्हणतात की, लोकमान्य टिळकांनी ह्याच गणपती उत्सवाची प्रेरणा घेऊन भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला गणपती उत्सव सार्वजानिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले आणि यातूनच त्यांनी स्वातंत्र्याचा लढा उभा केला व स्वतंत्र्याची मशाल प्रज्वलित केली.हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपूरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येते.या उत्सवाला आज २३९ वर्षे पूर्ण होत आहेत म्हणजेच ही ऐतिहासिक परंपरा आहे.श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती.तीच परंपरा आजही आपल्याला विदर्भात पहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते.त्याकाळी लावण्या,भारूड,पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्मक कार्यक्रम आले यात आर्केस्ट्रा, सुगम संगीत,नाटक,समाजप्रबोधन, नवीन पिढीला आनंद देणाऱ्या वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते. हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते आणि हाडपक्या गणपतीचे विसर्जन करण्यात येते. यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणाला व उत्सवाला आगळेवेगळे महत्त्व असून त्याला अत्यंत महत्व असते.मग तो कोणत्याही धर्माचा उत्सव असो यातुनच आपली जडणघडण व विविधता दिसून येते,आपण परीपक्व होतो व आपल्या परिवाराला संस्कृतीतून चांगली चालना मिळते. यामुळेच आज संपूर्ण जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते.ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे.त्याकाळी भोसले घराण्यातील राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले (उर्फ चिमणाबापू) यांनी बंगालमध्ये इंग्रजांशी कडवी झुंज दिली व विजय प्राप्त केला.त्याच धर्तीवर आपल्याला बदलत्या हवामानावर विजय प्राप्त करण्यासाठी कडवी झुंज देण्याची गरज आहे.कारण वाढते औद्योगिकीकरण,जंगलतोड, शहरीकरण,सिमेंटीकरण यामुळे हवामानात आमुलाग्र बदल होत असल्याने मोठ्या प्रमाणात प्रदुषणाचे प्रमाण वाढल्याने वृक्षलागवड करण्याची नितांत गरज आहे.कारण येणाऱ्या काळात बदलत्या हवामानामुळे आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी व पुढील पिढीला सुरक्षित करण्यासाठी हाडपक गणपती उत्सवाच्या निमित्ताने दहा दिवसांच्या काळात सरकारने,सामाजिक संघटनांनी,शाळा-महाविद्यालयांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून हिरवागार गालिचा निर्माण करून निसर्ग प्रफुल्लित करावा.कारण पुर्वी राजे-महाराजे निसर्गाच्या सान्निध्यात रहायचे त्याचे अनुकरण आपण वृक्षलागवडीच्या रूपात करून निसर्गरम्य वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी आपणासर्वांवर आली आहे.त्या अनुषंगाने हडपक्या गणपती उत्सवाप्रमाणे सर्वत्र निसर्गाचा विजय उत्सव साजरा व्हावा अशी गणरायाच्या चरणी प्रार्थना करतो.गणपती बाप्पा मोरया!



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.न९९२१६९०७७९, नागपूर**

## उपविभागीय अधिकरी/ कार्यालय परतुर जि. जालना

संकेत स्थळ : WWW jalna.nic.in Email ID- sdmpartur@gmail.com
दुरध्वनी क्रमांक : ०२४८-२२१००१ फॅक्स क्रमांक ०२४८४-२२१००१
जा. क्र. २०२६/भुसंपादन/ सिआर- दिनांक १०/०९/२०२६

**वाचा :- १ कार्यकारी अभियंता जालना लघुपाटबंधारे विभाग जालना यांचे कार्यालयाचे पत्र जा. क्रं. जालपाविजा/ भुसं/ १५३१/ दिनांक १०.८.२०२६**

## जाहिर नोटीस

सर्व जनता मौजे उस्वद देवठाणा ता. मंठा जि. जालना यांना या जाहिर नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, मौजे उस्वद देवठाणा ता. मंठा जि. जालना येथील गट क्रमांक ०४, ०५, ०६ एकूण क्षेत्र ०१ हे.१० आर जमीन महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई ३२ यांचे कार्यालया कडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/०३/२०१५/प्र.क्र.३४/अ २/ दिनांक १२.५.२०१५, तसेच शासन निर्णय दिनांक ३०.९.२०१५, शासन परिपत्रक क्रमांक एलक्यूएन /०१/२०१७ /प्र.क्र.१२/अ-२ दिनांक २५.१.२०१७ शुध्दीपत्रक दिनांक २७.११.२०१७ मधील तरतूदी नुसार खाजगी वाटाघाटीने घेट खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता जालना लघुपाटबंधारे विभाग जालना यांनी मा. जिल्हाधिकारी जालना यांचे कार्यालयास सादर केला आहे.

सदरचा प्रस्ताव उपजिल्हाधिकारी भूसंपादन समन्वय जालना यांनी त्यांचे पत्र जा.क्र.२०२०/भूसं/समन्वय/कावी- दिनांक २०.२.२०२० व कार्यकारी अभियंता जालना लघुपाटबंधारे विभाग जालना यांनी संदर्भ क्रमांक १ वरील पत्रान्वये सदरचे प्रस्तावा अनुषंगाने खाजगी वाटाघाटीने सरळ खरेदी करणे बाबतची प्रक्रिया पूर्ण करणे बाबत कळविले आहे. सदर प्रकरणात या कार्यालयाने उप अधिक्षक भूमी अभिलेख मंठा यांचे कार्यालया कडून यापुर्वीच गट क्रमांक ०४, ०५, ०६ मधील क्षेत्र ०१ हे.१० आर जमीनीची मोजणी करुन घेतलेली आहे. तसेच सदर प्रकरणात या कार्यालयाने खाजगी वाटाघाटीने जमीन सरळ खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. या संपादना बाबत कोणाचा कांही अक्षेप, हरकती, उजर, खरेदीखत, दानपत्र, बक्षीसपत्र ताबा किया इतर कांही असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाचे आत माझे समक्ष योग्य त्या पुराव्यासह हजर राहून सादर करावेत. मुदतीत अक्षेप अगर हरकती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास सदरची मालमत्ता हो निर्वावाद आहे. असे गृहीत धरुन नियमानुसार खाजगी वाटाघाटीने थेट जमीन खरेदी करण्याची कार्यवाही करण्यात येईल व त्या नंतर कोणाचा ही अक्षेप अथवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाही.

| अ. क्र. | जमीन मालकांचे नावे | गावाचे नांव तालुक जिल्हा | खाजगी वाटाघाटीने घ्यावयाचा सर्वे नंबर/गट क्रमांक | संपादीत करावयाचे क्षेत्र हे. आर | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | भगवान प्रल्हाद लोमटे<br>विठ्ठल प्रल्हाद लोमटे | उस्वद देवठाणा.ता. मंठा | ०४ | ०.४५ | उस्वद देवठाणा ता. मंठा येथील गट क्रं. ४,५,६ मधील १ हे १० आर जमीन कोल्हापुरी बंधाऱ्या करीता अतिरीक्त स्वरुपात संपादन करणे बाबत |
| २. | वनिता भानुदास कांबळे<br>रामभाऊ राजु कांबळे | उस्वद देवठाणा.ता. मंठा | ०५ | ०.६० | |
| ३. | प्रयागबाई कल्याण पुरी | उस्वद देवठाणा.ता. मंठा | ०६ | ०.०५ | |
| | | | एकुन | १.१० | |

**ठिकाण :- परतुर**
**दिनांक १०-०९-२०२६**

**(पदमाकर गायकवाड)**
**उपविभागीय अधिकारी**
**परतुर जि. जालना**

### नंदापूरमध्ये भारतमातेच्या मंदिराचा राष्ट्रभक्तीचा जागर

# भगवान बाबांनी भगीरथाप्रमाणे भारतमाता नंदापूरमध्ये आणण्याचा संकल्प साकारला : अभिजीत हरकरे

## राष्ट्रगान, बौद्ध वंदना अन् शिवराय-डॉ. आंबेडकरांना अभिवादन; सामाजिक समता, सर्वधर्मसमभावाचा संदेश देत भारतमाता मंदिराच्या पहिल्या टप्प्याचे उत्साहात लोकार्पण

**जालना - प्रतिनिधी**

भगीरथाच्या प्रयत्नातून गंगा पृथ्वीवर अवतरल्याची श्रद्धा आहे. त्याच धर्तीवर गुरुवर्य ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांनी नंदापूरमध्ये भारतमाता मंदिर साकारण्याचा संकल्प केला आणि तो प्रत्यक्षात आणण्यासाठी अथक प्रयत्न केले. भारतीय संस्कृती, संस्कृत भाषा आणि सनातन परंपरेतील राष्ट्रभावनेचा जागर या मंदिराच्या माध्यमातून होणार आहे,'' असे प्रतिपादन पश्चिम भारत कार्यकारिणी सदस्य व संघ प्रचारक अभिजीत हरकरे यांनी केले. गुरुवर्य ह.भ.प. डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या भव्य भारतमाता मंदिराच्या पहिल्या टप्प्याचा लोकार्पण सोहळा सोमवार, दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी नंदापूर येथे मोठ्या उत्साहात आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभिजीत हरकरे उपस्थित होते. जालन्याचे उद्योजक घनश्यामजी गोयल यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रगान, त्यानंतर बौद्ध वंदना आणि छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. या माध्यमातून राष्ट्रभक्तीबरोबरच सामाजिक समता, सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला. सोहळ्यास आमदार अर्जुनराव खोतकर, भास्करराव आंबेकर, माजी आमदार अरविंद चव्हाण, भास्करराव दानवे यांच्यासह संत-महंत, विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





मार्गदर्शन करताना अभिजीत हरकरे यांनी भारतीय संस्कृतीतील श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या जीवनकार्याचा संदर्भ देत भारताच्या सांस्कृतिक एकात्मतेचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, ''श्रीरामांनी भारतवर्षातील विविध भागांमध्ये प्रवास केला. देशाच्या वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. श्रीकृष्णांच्या जीवनप्रवासातूनही भारतातील विविध प्रदेशांमधील सांस्कृतिक संबंध अधोरेखित होतात. भारताची सांस्कृतिक एकात्मता ही केवळ आजची संकल्पना नसून तिची मुळे आपल्या प्राचीन परंपरेत खोलवर रुजलेली आहेत. भारतीय संस्कृतीमध्ये देशाच्या विविध भागांना जोडणारी अनेक प्रतीके आणि परंपरा असल्याचे सांगत त्यांनी भारतमाता मंदिराच्या संकल्पनेचे महत्त्व विशद केले. ''भगीरथाने गंगा आणली; भगवान बाबांनी भारतमाता आणण्याचा संकल्प केला'' भारत माता मंदिराच्या उभारणीमागील भगवान बाबा आनंदगडकर यांच्या संकल्पनेचा उल्लेख करताना हरकरे म्हणाले की, भगीरथाने अथक प्रयत्न करून गंगा पृथ्वीवर आणल्याची श्रद्धा भारतीय संस्कृतीत आहे. त्याच धर्तीवर भगवान बाबांनी नंदापूरमध्ये भारतमाता मंदिर उभारण्याचा संकल्प केला आहे.

या मंदिराच्या माध्यमातून भारतीय संस्कृती, राष्ट्रभावना आणि सामाजिक मूल्यांचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्कृत भाषा, भारतीय संस्कृती आणि सनातन धर्माच्या विविध पैलूंवरही हरकरे यांनी यावेळी मार्गदर्शन केले. भारत माता मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यातील विशेष वैशिष्ट्य म्हणजे कार्यक्रमाची झालेली सुरुवात आणि मांडणी. राष्ट्रगानाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर बौद्ध वंदना घेण्यात आली. उपस्थित मान्यवरांसह नागरिकांनी बौद्ध वंदनेत सहभाग घेतला. तसेच लोकार्पण सोहळ्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विविध समाजघटक आणि जाती-धर्मांतील नागरिकांना या सोहळ्यासाठी निमंत्रित करण्यात आले होते. त्यामुळे भारतमाता मंदिराच्या माध्यमातून राष्ट्रप्रेमासोबत सामाजिक समता, एकोपा आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून दिसून आला. लोकार्पण सोहळ्यापूर्वी गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. टाळ-मृदंगाचा गजर, भजनी मंडळींचे सादरीकरण आणि उत्साही ग्रामस्थांच्या सहभागामुळे मिरवणुकीला मोठे स्वरूप प्राप्त झाले. ग्रामस्थांनी मान्यवरांचे उत्स्फूर्त स्वागत केले. मिरवणूक भारतमाता मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मंदिराच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले.

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी भारतमाता मंदिराच्या पुढील विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले, ''भगवान बाबांच्या हस्ते नंदापूरमध्ये भारतमाता मंदिराची मुहूर्तमेढ रोवली गेली, हा भाग्याचा क्षण आहे. आपल्या भागात भारतमातेचे मंदिर साकारत असल्याचा आनंद आहे. मंदिरासाठी तीर्थक्षेत्र नोंदणी, तीर्थक्षेत्र निधी आणि पर्यटन निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. परिसराच्या विकासासाठी बाबांनी दिलेल्या सूचनांचे पालन केले जाईल. व्यासपीठावर बौद्ध पंचशीलाचे नमन करण्यात आल्याचा सार्थ अभिमान असल्याचेही खोतकर यांनी सांगितले. भगवान बाबा यांच्या कार्यामध्ये सर्वधर्मसमभावाची भावना असल्याचे नमूद करत भारतमाता मंदिराच्या माध्यमातून सर्व धर्मांचे नागरिक एकत्र येऊन गुण्यागोविंदाने राहतील, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष घनश्यामजी गोयल यांनी राष्ट्रप्रेम आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. ''पालकांनी आपल्या मुलांवर चांगले संस्कार करून त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण केली पाहिजे. भारत हा आपल्या देशाला माता मानणारा देश आहे. नंदापूरमध्ये भारतमातेचे मंदिर साकारत आहे, ही आनंदाची आणि भाग्याची बाब आहे,'' असे घनश्यामजी गोयल यांनी सांगितले. माजी आमदार अरविंद चव्हाण यांनी गुरुवर्य भगवान बाबा आनंदगडकर यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख केला. विविध समाजघटकांना सोबत घेऊन चालणे, नागरिकांना व्यसनमुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यांना अध्यात्माच्या मार्गावर आणणे, अशा विविध माध्यमातून भगवान बाबांचे कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. समता आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्याबरोबरच आनंदगड येथील आश्रमात विविध धर्मांच्या श्रद्धेचे प्रतीक असलेल्या मूर्ती उभारण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचेही चव्हाण यांनी नमूद केले. भास्करराव दानवे यांनी भारतमाता मंदिराच्या उभारणीबद्दल समाधान व्यक्त केले. देशात विविध देव-देवतांवर श्रद्धा असली तरी भारतमाता ही संकल्पना राष्ट्राशी जोडलेली आहे. नंदापूरमध्ये भारतमातेचे मंदिर साकारत असून, या माध्यमातून भारतमातेची सेवा करण्याची संधी नागरिकांना मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. भारत माता मंदिराच्या उभारणीत योगदान देणाऱ्या विविध व्यक्तींचा यावेळी गौरव करण्यात आला. मंदिरासाठी जमीन उपलब्ध करून देणारे, बांधकाम करणारे कामगार, शिल्पकार तसेच विविध माध्यमातून सहकार्य करणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. मंदिराच्या उभारणीमागे योगदान देणाऱ्या सर्व घटकांचा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. लोकार्पण सोहळ्यानिमित्त सुमारे दहा हजार भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला ॲड. एकनाथराव शिंदे यांच्या हस्ते भगवान बाबांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर भाविकांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली. पंचक्रोशीतील भाविक म्हणून त्यांची ओळख असून, विविध ठिकाणी अन्नदानाच्या माध्यमातून ते सेवा करीत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. पुढील टप्प्यासाठी सहकार्याचे आवाहन भारत माता मंदिराच्या उभारणीचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून, त्याचे लोकार्पण करण्यात आले आहे. मंदिराच्या पुढील टप्प्यातील कामे पूर्ण करून मुख्य लोकार्पण सोहळा आयोजित करण्याचा मंदिर समितीचा मानस आहे. पुढील कामांसाठी आणखी निधीची आवश्यकता असल्याने नागरिक, भाविक आणि दानशूर व्यक्तींनी आपल्या क्षमतेनुसार सहकार्य करावे, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले.

नंदापूर हे गाव द्राक्ष उत्पादनासाठी ओळखले जाते. येथील शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात गावाची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यातच आता समृद्धी महामार्गापासून अवघ्या काही मिनिटांच्या अंतरावर उभारले जात असलेले भारतमाता मंदिर नंदापूरच्या ओळखीत आणखी एक महत्त्वाची भर घालणार आहे.

# पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्याकडून पीक परिस्थितीची पाहणी

**जालना - प्रतिनिधी**

पावसाने ओढ दिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झालेल्या भागाची पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी पाहणी केली. पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी आज बदनापुर तालूक्यातील कडेगाव, गेवराई बाजार आणि गोकुळवाडी तसेच जालना तालुक्यातील गणेशनगर शिवारातील शेतांमध्ये जाऊन पिकांची स्थिती जाणून घेतली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे जालना आणि बदनापुर तालूका दौऱ्यात शेतकरी बांधवांना आधार देत म्हणाल्या की, नुकसानग्रस्त पिकांची अवस्था पाहिल्यानंतर परिस्थिती गंभीर आहे. परंतु शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये.



राज्य शासनाकडून दुष्काळाचा सामना करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय घेतले आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, कृषी कर्जाच्या वसुलीला स्थगिती आणि कृषीपंपांच्या चालू वीजबिलात सवलत देण्याचा समावेश आहे.

पिण्याचे पाणी आणि पशुधनासाठी चारा यासाठी प्रशासकीय स्तरावर नियोजन केले जात आहे. ज्या भागात चाऱ्याची तीव्र टंचाई आहे, तिथे तातडीने चारा डेपो सुरू करणे आणि गाळपेरा जमिनींचा योग्य वापर करण्याबाबत धोरण आखले जात असल्याचे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी सांगितले. शेतकरी आणि शेतमजुरांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. बँक खात्यात तांत्रिक त्रुटी नसलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना मदतनिधीचे वाटप वेगाने सुरू असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार अर्जून खोतकर, आमदार नारायण कुचे, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, जिल्हा अधिक्षक गहिनीनाथ कापसे, बदनापुर उपविभागीय अधिकारी लता बागुल यांच्यासह अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# ५१ वेळा रक्तदान करणारे कृष्णा सोनवणे यांचा सत्कार

**परतूर - प्रतिनिधी**

परतुर येथील नवतरुण गणेश मंडळ व माजलगाव रक्तपेढी यांच्यावतीने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. ५१ वेळा रक्तदान (अर्धशतक) करून सामाजिक कार्यक्रमात हातभार लावल्याबद्दल कृष्णा विठ्ठलराव सोनवणे महसूल सेवक उपविभागीय अधिकारी कार्यालयातील यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते विठ्ठल कांगणे, संचालक-स्वामी विवेकानंद करिअर अकॅडमी परभणी, सामाजिक कार्यकर्ते कुणाल शहाणे, सुधीर हजारे, कॉन्स्टेबल विजय जाधव, सचिन काटे, प्रमोद



राठोड, विक्रम वाघमारे नवतरुण गणेश मंडळ पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# गणपतीचा सण अन् ३० पर्यंत पाढे म्हण!

### पाढे पाठांतर स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मंठा - प्रतिनिधी**

तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नूतन वसाहत तळणी येथे 'गणपतीचा सण आणि ३० पर्यंत पाढे म्हण' या अभिनव शैक्षणिक उपक्रमांतर्गत पाढे पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या स्पर्धेत तब्बल ४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांचे पाढे पाठांतर, गणितीय अचूकता, जलद गणना व आत्मविश्वास वाढविण्याच्या उद्देशाने स्पर्धा तीन फेऱ्यांमध्ये घेण्यात आली. विशेष म्हणजे जवळपास सर्वच विद्यार्थ्यांनी २५ पर्यंतचे पाढे पाठ केले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचा



नियमित सराव आणि उपक्रमाचा प्रभाव अधोरेखित झाला. इयत्ता तिसरीमध्ये प्रतीक प्रकाश मस्के याने प्रथम, राजवीर भागवत गुजर याने द्वितीय, तर विराज शालिग्राम कुकडे याने तृतीय क्रमांक मिळविला. इयत्ता चौथीमध्ये अंजली प्रकाश सदावर्ते व रुद्राक्ष रवींद्र गवते यांनी विभागून प्रथम, सार्थक राजू ढवळे याने द्वितीय, तर स्वराज शालिग्राम कुकडे याने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्या विद्यार्थ्यांना स्टडी टेबल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या गणितीय विचारक्षमता, मानसिक गणना, संख्याज्ञान, अचूकता आणि गणिती क्रियांमधील वेगाला चालना मिळत असल्याचे दिसून आले. या प्रसंगी सेवानिवृत्त माजी सैनिक श्री. हरिदास सोनूने, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष शिवशर्मा सोनूने, श्री. शिवाजी सदावर्ते, श्री. राहुल भडदम, श्री. शालिग्राम कुकडे, सर्व अंगणवाडी सेविका, मुख्याध्यापक श्री. रंगनाथ खंदारे तसेच श्री. जागृत एस. पी. सर उपस्थित होते. ''पाढे पाठांतरातून गणिताशी मैत्री, सरावातून आत्मविश्वास आणि स्पर्धेतून गुणवत्ता!'' या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक, ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीने कौतुक केले.

# रिपाइंच्या जिल्हाध्यक्षपदी मधुकर बोबडे तर महानगराध्यक्षपदी महेंद्र रत्नपारखे यांची निवड

**जालना - प्रतिनिधी**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या ( आठवले गट) जालना जिल्हाध्यक्षपदी (ग्रामीण) ज्येष्ठ कार्यकर्ते मधुकर बोबडे यांची निवड करण्यात आली असून जिल्हा महानगराध्यक्षपदी महेंद्र रत्नपारखे यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान, मराठवाडा उपाध्यक्षपदी अंकुश चव्हाण तसेच सचिवपदी जी. एस. पट्टेकर व सदस्यपदी मुकुंद पाइकराव यांची निवड करण्यात आली आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेश संघटन सचिव ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी ( दि. २७) जालना शहरातील डबल जीन येथे झालेल्या



बैठकीत ही निवड करण्यात आली. या बैठकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या विविध आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली.

या बैठकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी प्रकाश रूपवते, जिल्हा सरचिटणीसपदी बबन रत्नपारखे यांची निवड करण्यात आली. युवक आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी लहू उघडे यांची निवड करण्यात आली. जिल्हा उपाध्यक्षपदी आसाराम साबळे यांची निवड करण्यात आली. महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी संगीता अंभोरे यांची तसेच महिला आघाडीच्या जालना शहराध्यक्षपदी आशा नाईक यांची निवड करण्यात आली आहे.महिला आघाडीच्या जिल्हा संघटकपदी नाटकर यांची निवड करण्यात आली.

कामगार आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी अनिल वानखेडे यांची तर अल्पसंख्यांक आघाडीच्या अध्यक्षपदी अझहर पठाण यांची निवड करण्यात आली आहे. या बैठकीत ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी मार्गदर्शन करतांना रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे संघटन वाढीसाठी तसेच अन्याय- अत्याचाराविरुद्ध आवाज उठविण्यासाठी कार्यकर्ता सदैव जागरूक असायला, असे आवाहन केले. बैठकीस मराठवाड्याचे नेते सुधाकर रत्नपारखे, युवक आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. सिद्धार्थ चव्हाण, स्मिता चव्हाण, राजू भिंगारदेव, घुगे, नईम बेग, रमेश चव्हाण, सुरेश खरात यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जालना जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.